Press Clippings
Publication : Mumbai Lakshdeep
Edition : Mumbai
Date : Monday, April 25, 2016
Page No. : 3

# प्राचीन आणि वतर्मान काळातील नाणी, मुद्रा आणि चलनी नोटा




## जगातील पहिल्या ऑनलाइन म्युझियमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई, दि.२४:** मिंटेजवर्ल्ड डॉट कॉम (www.mintageworld.com)या प्राचीन आणि वतर्मान काळातील नाणी, मुद्रा आणि चलनी नोटा यांच्या जगातील पहिल्या ऑनलाइन म्युझियमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले असून, आधुनिक भारताला आणि देशातील तरुणांना प्राचीन आणि वतर्मान काळातील नाणी, मुद्रा आणि चलनी नोटा यांचा संग्रह करण्यातील आनंद देणे हा या ऑनलाइन म्युझियममागचा उद्देष आहे.प्राचीन नाणी, मुद्रा, नोटा यांच्या प्रदशर्नासाठी प्रसिद्ध असणा-या शुक्ला डेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे भरवल्या गेलेल्या रौप्य महोत्सवी प्रदशर्नाविळी मिंटेज वर्ल्डचे सीईओ श्री सुशीलकुमार अग्रवाल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या ऑनलाईन म्युझियमचे उद्घाटन करण्यात आले. आपला ऐतिहासिक वारसा, परंपरा आणि संस्कृती यांची समकालिन भारताला आणि जगाला माहिती देण्याचे मिंटेज वर्ल्ड हे उत्तम माध्यम आहे. हे ऑनलाइन म्युझियम एकाच ठिकाणी मुद्रा, नाणी आणि चलनी नोटा यांच्याबद्दल सविस्तर माहिती देते. नाण्यांचा इतिहास हा विभाग तर अत्यंत रोमांचकारी आणि मनोरंजक माहिती देतो. त्यात असलेल्या अधिकृत घराणे, राजघराणे, राज्यकर्ते यांच्या काळातील नाण्यांची रंजक माहितीमुळे हा एक महत्त्वाचा विभाग ठरतो. या तिन्ही गोष्टींसंदर्भात जगाला माहिती आणि ज्ञान देणे हा एकमेव उद्देश या ऑनलाइन म्युझियम सुरू करण्यामागे आहे. ही माहिती सहज उपलब्ध होऊन शेअरही करता येणार आहे. त्यातील अपडेट्सही बघता येणार आहेत. हे ऑनलाइन म्युझियम या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि संशोधक यांना त्यांचा अनुभव नाणी, मुद्रा आणि चलन संकलन करण्याचा छंद असणा-यांसमोर मांडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देते. भारताचा तेजस्वी इतिहास, कला आणि संस्कृतीची अलौकिक परंपरा यांचे महत्त्व पुनर्स्थापित करण्यास उपक्रमामुळे फायदा होईल. शिवाय आपल्या देशाच्या संस्कृतीला जगातील संकलकांमध्ये पुन्हा ते स्थान मिळेल.

उद्घाटनानंतर श्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एक अनोखे ऑनलाइन म्युझियम तयार करणारे सुशीलकुमार यांचे आणि संकलकांना नवीन व्यासपीठ देणारे शुक्ला डे यांचे मी अभिनंदन करतो. आपल्याला आपला इतिहास, संस्कृतील आणि परंपरा यांची माहिती हवी असल्यास आपल्याला त्या काळातील नाणी, मुद्रा आणि चलन यांची माहिती घ्याची लागते. मिंटेज वर्ल्ड आणि शुक्ला डे यांच्या माध्यमातून आपण आपली ही पारंपरिक ठेव जपू शकतो आणि ते लिलावातही मांडू शकतो. तुम्ही एकदा हे पाहिले तर तुम्ही थेट इतिहासात पोहोचता. मला इतिहास आवडतो आणि माझी ही आवड जपण्यासाठी www.mintageworld.com हे एक उत्कृष्ट माध्यम आहे.